वर्ष ३४ | ऑक्टोबर २०२६ | अंक १० | ४०६

पॉप्युलर प्रकाशन

प्रिय रसिक

आपल्यासाठी आणि मित्रांसाठी


३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६, दूरध्वनी : ०२२ - २३५३०३०३
Email: info@popularprakashan.com / Website: www.popularprakashan.com
/popularprakashan popularprakashan @PopularPrakashn

अंकविशेष



फोटोग्राफ - भावना अन् जाणिवांचं गहिरं कम्पोझिशन

किरण क्षीरसागर



व्रतस्थ ज्ञानसाधक : स. मा. गर्गे

आणि

मराठी रियासत



नीरजा : संवेदनशील स्त्रीवादाची अभिव्यक्ती

स्वाती काळे



दास्तान-ए-तुर्की

देर्दा

लेखक : हकन गुंदे
भाषांतर : शर्मिला फडके

फोटोग्राफ

भावना अन् जाणिवांचं गहिरं कम्पोझिशन

किरण क्षीरसागर

चांगल्या कथा वाचकाला वाचनानंदाच्या पलीकडे नेतात. त्याला आनंदित करण्यासोबत त्या तितकंच अस्वस्थही करतात. कधी मनाचा तळ खरवडून काढतात, तर कधी मोरपिसांसारख्या हळुवार संवेदना जागवतात. अशा कथांनी साकारलेल्या विश्वात वाचक जेव्हा मुशाफिरी करत हिंडतो, तेव्हा त्याला फक्त अनुभवच नव्हे, तर एखादा विचार, आगळा दृष्टीकोन, तर कधी हुरहुरत्या प्रश्नांची बिदागी मिळते. हिनाकौसर खान हिच्या ***फोटोग्राफ*** *या कथासंग्रहातील कथा अशाच. त्या वाचकाला रिकाम्या मनानं जाऊच देत नाहीत...*

पुस्तकातील पहिली कथा, 'मीच माझी मुमताज', संपत येते, तोपर्यंत या लेखिकेनं वाचकावर पकड घेतलेली असते. स्वगत शैलीत सांगितली जाणारी ही 'अनार' नावाच्या स्त्रीची कथा, बाईचं शरीर, तिचं मन आणि तिचा चॉईस अशा त्रिकोणात उभी राहते. ही कथा 'आई'ची पारंपरिक भूमिका आणि त्यात अडकलेली-अडकवलेली 'स्त्री' नावाची व्यक्ती यांचा विचार मांडते. कथेला येणारं टोक भावना आणि विचार अशा दोघांत चलबिचल घडवतं.

हिनाच्या कथांचा फोकस प्रश्न मांडण्यावर नाही. तिला माणसांच्या कथाच सांगायच्या असतात. प्रश्न अनुषंगाने येतात. त्या प्रश्नांसोबत येणारे पेच आणि त्या पेचात वावरणारी, निर्णय घेणारी-न घेणारी माणसं दिसत राहतात. 'बीज' कथेतली मीनाताईच पाहा; ही बाई दांडेलीच्या अभयारण्यात ऑफिसच्या पिकनिकवर आली आहे. तिच्या मन-शरीराची अस्वस्थता, सहकाऱ्यांसोबत घडणारा संवाद आणि त्यातून निर्माण झालेल्या विचारांच्या घुमटात तिचं पाकोळीसारखं भिरभिरणारं मन. असहजाची किनार घेऊन तिचं निवेदन सुरू राहतं. ती कथा

मीनाताईच्या भूतकाळाचा पट उभा करत, तिच्या मन आणि शरीरातील 'बीजा'चा दुहेरी विचार मांडते.

'माया'मधील गर्भावस्थेतील स्त्रीचं मन रोमान्सकडे ओढ घेतंय. त्या ओढीच्या वाटेत तिच्या सहेलींची पार्लरमधली बडबड, त्यांच्याकडून तिला प्रथमच कळलेला 'पॉर्न' हा शब्द आणि त्याचा अर्थ, आणि जोडीला शरीराचं अवघडलेपण आहे. मायाची कथा तिच्याएवढीच तिच्या मैत्रीणींची आहे. पण ती सगळ्यात जास्त तिच्या मनाच्या मागणीची आणि त्यातील भाबड्या विश्वासाची आहे. कथा छानशा नोटवर पोचणार असं वाटत असताना, केवळ एका वाक्याचा फटकारा, खूपच सूचकतेने, पात्राच्या भाबडेपणाशेजारी जीवनाचं वास्तव आणून उभं करतो. ती रचना धक्का देत नाही, फक्त डोक्यातलं चक्र अधिक गतिमान करते.

'धग' ही कथा वाचून डोकं सैरभैर होतं. आदर्श बाई होण्याच्या प्रयत्नात असलेली शुभा ही पेशाने पत्रकार. घर, ऑफिस, फिल्ड अशा तिन्ही स्तरांवर तिला भेटणारे पुरुष आणि त्यांच्याकडून तिचा होणारा कोंडमारा हे तिचं वास्तव. शुभाला तिची स्थिती आर्टीक्युलेट करता येते. ती म्हणते —

"घर ही माझीच जबाबदारी आहे, हे कुंपण मी स्वत:भोवतीच घालून घेतलं. त्यात जरा जरी कसूर राहिली, तर मला अपराध्यासारखं वाटतं. 'घर ही बाईची जबाबदारी', या संस्कारातून मला स्वत:ची कधीच सोडवणूक करता आली नाही. मी शरदकडून अपेक्षाच काय करणार?"

ही वाक्यं कित्येक स्त्रियांच्या अनुभवविश्वाशी सहज साधर्म्य साधतील अशी आहेत. बाईची पारंपरिक भूमिका आणि तिची जीवनाबद्दलची कल्पना यात पसरलेलं वास्तवाचं विस्तीर्ण वाळवंट लेखिका या आणि इतर कथांमधून अलगद चितारते. कुठलाही मुद्दा किंवा प्रश्न मांडत असल्याचा आव त्या लेखनात नाही. कदाचित म्हणूनच इतक्या सहजपणे साकार होणारं ते चित्र मनाला भुंग्यासारखं पोखरत जातं.

हिनाचं लेखन क्वचितच वर्णनांकडे झुकतं. तिच्या कथांमध्ये पात्रांचीही वर्णनं नसतात. तरीदेखील, तिची पात्रं नाक-डोळ्यांसह आणि जागा त्यांच्या गंध-रूपांसह डोळ्यांसमोर उभ्या राहतात. कारण तिचं लेखन संवादी आहे आणि कथनशैली अगदी साधीसोपी. कुणीतरी रंगवून किस्सा सांगितल्यासारखी.

'पोंग्या' ही कथा तर कुठल्यातरी मुलानं मित्राला सांगितलेला किस्सा वाटावा अशीच आहे. बोल्ड विषयाचं आवरण घेतलेली ही कथा, जेन-झी पिढीतल्या तरुणाचा सेक्स, आकर्षण आणि ओढ असा तिहेरी मजेशीर गुंता मांडते.

'भूक' कथेतील स्त्री संवादासाठी भुकेली आहे. ती तिच्या इच्छेविरोधात लॉकडाऊनमुळे नवऱ्यासोबत घरात कोंडलेली आहे. त्याच्याकडून फसगत झाल्यामुळे दुखावलेलं-वैतागलेलं तिचं मन संवादाच्या वाटा धुंडाळू पाहतंय. पण तिला त्या वाटांवर चालता येत नसेल, तर त्रस्त झालेलं मन कसं दोलायमान होत राहतं, याची ही कथा.

या कथासंग्रहात एक मजेशीर बाब आहे. साधर्म्य साधणारी एकच थीम किंवा घटक वेगवेगळ्या कथांमध्ये दिसतात. 'मीच माझी मुमताज' आणि 'माया' यामधील स्त्रिया गर्भवती आहेत. 'बीज', 'धग' आणि 'भूक' यामध्ये नात्यांमध्ये झालेली फसवणूक किंवा हेळसांड आहे. (आणि तरीदेखील कथांचा अनुभव दोन टोकांचा म्हणावा असा वेगळा.) 'भूक'प्रमाणे 'मुकर्रर' या कथेतदेखील एक समान घटक आहे, तो म्हणजे लॉकडाऊन.

'मुकर्रर' ही सहवासातून आकाराला येणाऱ्या आकर्षणाची हळुवार, मात्र मजेदार कथा आहे. दोन अनोळखी माणसं एका बंदिस्त जागेत मनाविरुद्ध कोंडली गेली तर काय घडेल? या प्रश्नाला एक्सप्लोअर करत ही कथा फुलत जाते. (हीच थीम 'भूक' या कथेची, पण दोन्हीकडील कथानुभव दिवस-रात्रीइतका भिन्न.) कृष्णा आणि शितल घरच्यांच्या लग्नासाठीच्या आग्रहावरून एकमेकांना भेटतात. कृष्णा लॉकडाऊनने कोंडी केल्यामुळे दत्त म्हणून तिच्या घरी हजर होतो.

हिना ही कमालीचं रोमँटिक लिहिते. तिला दोन व्यक्तींमधला हुरहुर वाढवणारा ताण छान रेखाटता येतो. पण ती केवळ प्रसंगरचना नसते. त्या जोडीला असलेला पात्रांचा समजूतदारपणा, अल्लडपणा रंग भरतो. 'मुकर्रर' कथा ही पात्रांची हुरहुर वाचकाला बहाल करून जाते. रोमँटिक ढंगातील दुसरी आणि पुस्तकाची शीर्षककथा म्हणजे 'फोटोग्राफ'. फोटोग्राफर अविनाश आणि त्याच्या मैत्रिणीच्या माध्यमातून त्याला भेटलेली सोनिया यांची ही कथा. अविनाशला आवडणारी सोनिया वयाने मोठी आणि

विवाहित आहे. अशा पेचात असलेलं त्याचं मन काय करेल? आकर्षण आणि ओढ, या जाणिवांना परिस्थितीनुसार कसा वेगळा रंग येतो, याचं वेधक उदाहरण ही कथा सादर करते. मनात दुराव्याची अस्वस्थता उमटवणारी ही कथा शेवटाकडे येताना कधी हळुवार, गहिरं रूप धारण करते.

स्त्री किंवा पुरुष, दोघांच्या चित्रणामध्ये हिनाला विलक्षण तोल साधता येतो. स्त्रीची परवड, दु:ख, घुसमट मांडताना हिनाची लेखणी पुरुषावर तलवार घेऊन धावून जात नाही हे विशेष. एकीकडे स्त्रीचं दमन करणारा पुरुष लिहिताना, हिना तितकाच हळुवार, संवेदनशील आणि अगदी हवाहवासा वाटणारा पुरुषही मांडून जाते.

पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या या कथासंग्रहाच्या ब्लर्बवर लेखक-दिग्दर्शक क्षितिज पटवर्धन म्हणतात, की —

'हे कथाविश्व वॉटर कलरसारखं उठावदार किंवा रम्य नाही, तर ऑइल पेंटसारखं ठाशीव आणि वास्तववादी आहे. इथे चितारलेल्या माणसांवर आणि प्रसंगांवर असलेले आंतरिक, शारीरिक, सामाजिक, भौतिक असे अनेक

स्तर जाणवतात. हिनाने आजची माणसं त्यांच्या सगळ्या बारकाव्यांसहित आणि कुठल्याही जजमेंटशिवाय उभी केली आहेत. म्हणूनच या कथा वाचून झाल्यावर मन प्रत्येक स्ट्रोकवर रेंगाळत राहतं.'
हा पूर्ण ब्लर्ब वाचण्याजोगा आहे. तो या कथांचा अंतस्थ प्रवाह नेमकेपणाने विशद करतो.


संतोष घोंगडे यांनी चितारलेलं पुस्तकाचं मुखपृष्ठ हे रेखाटन, रचना, रंगसंगती आणि टेक्श्चर असं सगळ्याच बाबतीत आकर्षक आहे.

पुस्तकाच्या १६१ पानांत सामावलेल्या या आठ कथा जितक्या धाडसी आहेत, तितक्याच तरल आणि हळुवारसुद्धा. हिनाचे शब्द, तिच्या कल्पना आणि त्यांची वीण यांतून निर्माण झालेल्या या कथा झटकन क्लिक होणारा डिजीटल फोटो नाही, तर पोलोरॉईड कॅमेऱ्यातून बाहेर आल्यानंतर कागदावर हळूहळू उमटणारा संयत चित्राकार आहे. नेटका, नेमका आणि गहिरा...

❋❋❋

लोहोग्राफ

हिनाकौसर खान




किंमत
₹. २७५/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तक खरेदी करता येईल.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट
popularprakashan.com

Available on
amazon.in

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!



व्रतस्थ ज्ञानसाधक

स. मा. गर्गे

पत्रकार | इतिहास अभ्यासक | कोशकर्ते

कविता भालेराव

पत्रकारिता, राज्यशास्त्र व इतिहास या विषयांचे ग्रंथलेखन, संपादन आणि कोशकार्य अशा विस्तृत कार्यक्षेत्रात प्रदीर्घ कार्यरत असणारे स. मा. गर्गे यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९२० रोजी मराठवाड्यातील बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील लहुरी या त्यावेळच्या छोट्याशा खेडेगावात झाला. तत्कालीन ब्रिटिश आणि रझाकार अशा दोन्ही सत्तांच्या भीषण वर्चस्वाखाली असलेला हा प्रदेश. या पारतंत्र्याने होरपळून निघणारे तेथील सर्वसामान्य लोक, त्याचबरोबर गर्गे यांच्या कुटुंबाची तर अत्यंत हलाखीची आर्थिक स्थिती, घरचे दारिद्र्य, सभोवतालातील अज्ञान, अंधश्रद्धांचा अंधकार, रोगराई या सर्वांमुळे गर्गे यांच्या वयाची सुरुवातीची पंचवीस वर्षे अतिशय कष्टप्रद गेली.

रूढ अर्थाने त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेता आले नाही. परंतु वडिलांनी लहानपणीच त्यांच्या हातात अवांतर वाचनाची जी मिणमिणती पणती ठेवली होती, तिचे पुढील आयुष्यात अत्यंत जिद्दीने त्यांनी ओजस्वी अशा ज्ञानज्योतीमध्ये रूपांतर केले. अनेक ज्ञानशाखांच्या अभ्यासाने ही ज्योत कमालीची उजळवली. ग्रंथवाचन, चिंतन, विश्लेषण, संपादन आणि लेखन हेच नंतर त्यांच्या आयुष्याचे भागधेय ठरले.

सदाशिव मार्तंड लहुरीकर अर्थात स. मा. गर्गे. लहुरी गावात जन्मलेल्या आणि पिढ्यानपिढ्या 'लहुरीकर' हेच आडनाव आपल्या नावामागे लावणाऱ्या कुटुंबात जन्म होऊनही या लहुरीकराने मात्र पुढच्या आयुष्यात घडलेल्या घटनांनी आडनावामध्ये कारणपरत्वे बदल करवून घेतला आणि 'गर्गे' हे आडनाव स्वीकारले. स. मा. गर्गे या नावाने विद्येच्या क्षेत्रात 'अक्षर' कामगिरी केली.

व्रतस्थ ज्ञानसाधक : स. मा. गर्गे हे गर्गे यांचे चरित्र त्यांची कन्या आणि प्रसिद्ध लेखिका कविता भालेराव

यांनी लिहिले आहे. यंदा, ४ नोव्हेंबर रोजी गर्गे यांची १०६वी जयंती. त्याचे औचित्य साधून हे चरित्र प्रकाशित केले असून ते आता सर्व वाचकांकरिता उपलब्ध झाले आहे. पुस्तकाच्या सुरुवातीस आजन्म ज्ञानोपासक राहिलेल्या आपल्या वडिलांच्या चरित्रलेखनाबाबत कविता भालेराव आपल्या मनोगतात लिहितात —

... काकांना लहुरी गावात प्राथमिक शिक्षण पूर्ण करता आले. मात्र पुढील शिक्षणासाठी त्यांना लहुरीतून बाहेर पडावं लागलं होतं. छोट्याशा लहुरीतून अंबाजोगाई (तेव्हाचे मोमिनाबाद), बीड अशा मोठ्या गावांमधून, उर्दू भाषेतून मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेताना त्यांची बरीच दमछाक झाली. १९३७ पासून तर पुढचा दहा-बारा वर्षांचा कालखंड संपूर्ण मराठवाड्यासाठी नवजागराचा कालखंड होता. ... सर्व बाजूंनी कसोटी बघणाऱ्या काळात काकांच्या वैयक्तिक आयुष्यात महत्त्वाची तीन स्थित्यंतरे आली होती. पहिले १९३७-३८ या दोन वर्षांतील हैदराबादला वकिलीचे

शिक्षण घेतानाचे, दुसरे अकस्मात घडलेले १९४०-४५ या काळातील औरंगाबादला शिक्षकाच्या नोकरीचे तर तिसरे नागपूरला १९४६-४९ या वर्षांमधील पत्रव्यवसायात शिरकाव करून घेण्याच्या संधीचे! त्यामुळे या तीनही ठिकाणच्या त्या त्या काळातील बदलत्या परिस्थितीला काका कसे सामोरे गेले, त्यातून त्यांनी स्वत:ला कसं घडवलं या सर्व गोष्टींचा शोध मला घ्यायचा होता. अनेक धागेदोरे जोडायचे होते. ...

... काकांच्या आयुष्यातील १९४९ पर्यंतचा — वयाच्या तिशीपर्यंतचा — काळ अस्थैर्याचा, चाचपडण्याचा, अतोनात धडपडीचा, संकटांचा होता. त्याच वेळी पुस्तकांच्या वाचनवेडामुळे मनातील विचारांचा गोंधळ, चलबिचल यांच्याशी दोन हात करत ते स्वत:ला घडवत होते. ...

... जुन्या, कर्मठ संस्कारांच्या घरात, सनातनी सामाजिक वातावरणात जन्मलेल्या काकांचे विचार पुस्तकांच्या वाचनाने खूपच बदलत गेले. आर्यसमाजाची

तत्त्वे काय किंवा आगरकरांचे सुधारणावादी विचार त्यांनी त्यांच्या संस्कारक्षम वयात वाचले. आणि त्याचे इतके खोल परिणाम त्यांच्यावर झाले की त्यांनी पुढील आयुष्यात कधीही धार्मिक व्रतवैकल्ये, मूर्तिपूजा यामध्ये स्वत:ला अडकवून घेतले नाही. त्यांची श्रद्धास्थाने वेगळी झाली. ती वाचनाने आणि सभोवतालच्या परिस्थितीने आणि जगण्याच्या तीव्र संघर्षातून आलेली होती. त्यांनी स्वत:ची नास्तिक वृत्ती, बुद्धिप्रामाण्यवाद आयुष्यभर अगदी ठाम ठेवला. मात्र घरातल्या इतरांवर लादला नाही. ...

... पत्रकारिता, राज्यशास्त्र व इतिहास या विषयांचे ग्रंथलेखन, संपादन आणि कोशकार्य असा काकांच्या लिखाणाचा चौफेर विस्तार आहे. तो व्यापक आहे. ... वृत्तपत्रातील नोकरी आणि राज्यशास्त्र, समाजशास्त्र या विषयांवरील ग्रंथलेखन या दोन्ही वाटांवर काका समांतर वाटचाल करत होते. ... उच्च शिक्षणाचा किंवा कुठल्याही पदवीचा आधार नसताना वैचारिक लेखनाची त्यांनी निवडलेली वाटचाल बघितली म्हणजे त्यांचे बौद्धिक यश निखळ स्वकष्टार्जित असल्याचे तीव्रतेने जाणवते. ...



मराठी विश्वकोश कार्यालय, वाई १९९९
अध्यक्ष, मराठी विश्वकोश मंडळ
मे. पुं. रेगे यांच्यासमवेत



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, गौरववृत्ती
सन्मानपत्र प्रदान कार्यक्रम, २० मे १९९६, हस्ते
दै. केसरी'चे संपादक जयंतराव टिळक

... एक खंत जरूर वाटते. काकांनी त्यांच्या कामाचे स्वरूप, महत्त्व, आम्हा भावंडांना त्या त्या वेळी सोप्या पद्धतीने तरी सांगायला हवे होते. तसे झाले असते तर काकांची 'उंची' आम्हाला अधिक चांगल्या प्रकारे आणि लवकर समजली असती. प्रत्यक्ष चरित्र लिहिताना, अनेक बारकावे शोधताना या गोष्टीची तीव्रता मी अधिक अनुभवली. काही प्रश्नही अनुत्तरित राहिले.

... पुढील आयुष्यात काका कधी लहुरीला गेले नाहीत किंवा त्यांनी कधी आम्हालाही तिकडे नेले नाही. ह्याची माझ्यापुरती कारणे मी शोधली. त्यांना वाटत असावे की, लहुरीला गेलो तर जुन्या आठवणींच्या साहजिकच खपल्या निघतील. या आठवणी बहुतांशी हलाखीच्या, वडिलांच्या

मृत्यूच्या, रझाकारांनी वाड्यावर केलेल्या भीषण हल्ल्यात बळी पडलेल्या नातेवाइकांच्या, अशाच होत्या. वयाच्या जेमतेम दीड-दोन वर्षांतच आई जाण्याने आलेले पोरकेपण त्यांनी लहुरीत राहताना खूप अनुभवले आणि सोसले होते. ... त्या काळच्या भल्या-बुऱ्या आठवणींचे उसासे टाकून त्यांनी स्वत:ला किंवा ऐकणाराला व्यथित केले नाही. आपल्या दु:खद भावना न दाखवण्याची त्यांनी कटाक्षाने सवय लावून घेतली असावी. उलट ते अधिकाधिक वर्तमानाशी समाधानाने जुळवून घेत राहिले. हीच त्यांच्या चेहऱ्यावरच्या प्रसन्नतेची खुबी होती.

काका वयाच्या ८०-८२ वर्षांपर्यंत स्वत:ला कोणत्या ना कोणत्या कामात, विचारात गुंतवून ठेवू शकले. या सवयीचे मूळ त्यांच्या लहानपणात असावे. कारण शिक्षणासाठी दुसऱ्याच्या घरी राहताना हाताला एखादे काम आणि ते नसेल तेव्हा मनाशी संवाद, अशीच त्यांना सवय लागली असावी. या त्यांच्या सवयीला पुढे पत्रव्यवसाय पूरकच ठरला. कारण हा व्यवसाय मनाला व्यग्र ठेवणारा होता.

तो करताना आपल्या आजूबाजूच्या विविध घटनांमधून अलिप्त होता येत नाही. उलट सतर्क राहावे लागते. त्या घटना, घडामोडी, बातम्या वर्तमानपत्रात येण्यासाठी वेळेत काम पूर्ण करण्याची सवय लावूनच घ्यावी लागते. हे सर्व करताना डोक्यातील विचारांचे चक्र सतत फिरत राहते. अशा स्वरूपाच्या कामाच्या सवयीने स्वेच्छानिवृत्ती घेतानाच काही नवे लेखनकार्य करण्यासाठी, ते आपसूकच सरसावले. 'समाजविज्ञान कोश', 'मराठी रियासत'चे पुनर्संपादन अशा महत्त्वपूर्ण बहुखंडी मोठ्या प्रकल्पांच्या पूर्ततेचा आनंद त्यांनी मिळवला. वयाची पंचाहत्तरी ओलांडली तरी ते अभ्यासाला, चिंतनाला नवे विषय शोधत; त्यावर लिहीत राहिले. ही त्यांची स्वसाधनाश्रमाची उभारणी होती. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला त्रिमिती लाभली. ...


❋❋❋

व्रतस्थ ज्ञानसाधक

स. मा. गर्गे

पत्रकार | इतिहास अभ्यासक | कोशकर्ते

कविता भालेराव



किंमत
₹. ६७५/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७
या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील,
आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून
पुस्तक खरेदी करता येईल.

ऑनलाईन नोंदणीसाठी वेबसाईट :
www.popularprakashan.com

अधिक माहितीसाठी संपर्क :
9867242407

रियासतकार गो. स. सरदेसाई कृत

मराठी रियासत

आठ खंडांचा संच

प्रमुख संपादक : स. मा. गर्गे

सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक आणि लेखक रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या समग्र इतिहासाची — मराठी रियासतच्या तेरा भागांची — तत्कालीन नव्या ऐतिहासिक संदर्भांसह आठ खंडांमधील संपादित आवृत्ती १९८८ साली प्रकाशित झाली. बारा संपादक मंडळींच्या समितीने साधारण साडेचार हजार पृष्ठांच्या या दस्तावेजाच्या संपादनाची धुरा सांभाळली. या संपादकांचे मार्गदर्शक, दिशादर्शक म्हणून समितीच्या प्रमुख संपादकपदी स. मा. गर्गे होते.



मराठी रियासतच्या पहिल्या खंडात आपल्या संपादकीय मनोगतात गर्गे रियासतीविषयी लिहितात —

मराठी रियासतीची अनेक वैशिष्ट्ये आहेत. रियासतकारांनी मराठी वाचकांना आपला इतिहास जाणून घेण्याची लावलेली ओढ अद्याप कायम आहे. शहाजीराजे भोसले यांच्यापासून दुसरा बाजीराव पेशवा यांच्या कारकिर्दीच्या अखेरीपर्यंत मराठ्यांचा सुसूत्र, साधार, सलग आणि सविस्तर असा दुसरा इतिहास मराठीत कोणी लिहिलेला नाही. तो महत्त्वाचा इतिहास फक्त गो. स. सरदेसाई यांनीच मराठी रियासतीच्या द्वारे वाचकांना सादर केला. इ. स. १६०० पासून इ. स. १८१८ पर्यंत सुमारे दोनशे वर्षाच्या कालखंडातील महत्त्वाच्या घटना, त्या घडविण्यामागे असलेल्या तेवढ्याच महत्त्वाच्या व्यक्ती यांचा कालक्रमाने लिहिलेला मराठी भाषेतील हा एकमेव इतिहास आहे. मराठी सत्तेचा उदय, उत्कर्ष, उतरती अवस्था आणि अस्त या सर्व स्थित्यंतरांचे अतिशय मार्मिक, समतोल आणि


उपलब्ध पुराव्यांसह केलेले विवेचन मराठी रियासतीतच वाचावयास मिळते. मराठ्यांच्या कर्तृत्वाचे आणि मुत्सद्देगिरीचे, पराक्रमाचे आणि पराभवाचे, यशाचे आणि अपयशाचे ज्ञान इतिहासाच्या वाचकांना या रियासतीतूनच मिळू शकते.

१९०२ साली मराठी रियासतचे तेरा भाग प्रथमत: प्रसिद्ध झाले. त्यानंतर त्यांच्या बऱ्याच आवृत्त्याही निघाल्या. रियासतकार सरदेसाई यांचे १९५९ साली वयाच्या चौऱ्याण्णवव्या वर्षी निधन झाले. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी १९८८ मध्ये रियासतीची तत्कालीन नव्या संदर्भांसह संपादित आवृत्ती प्रकाशित करताना त्यामागचा आपला मानस गर्गे व्यक्त करतात —

तसे पाहिले, तर इतिहासाच्या विशिष्ट कालखंडात कितीही खोल जाऊन शोध घेतला तरी निरपवाद सत्य सापडले आहे असे कोणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही आणि हेच खरे निरपवाद सत्य आहे. ते ध्यानात

घेऊन जसजसे पुरावे मिळत जातील, तसतसे इतिहासाचे पुनर्मूल्यमापन करीत राहणे यालाच वास्तव इतिहासाची दिशा शोधणे असे म्हणता येईल. रियासतकार सरदेसाई यांनी रियासतीच्या प्रत्येक आवृत्तीत नव्या पुराव्याच्या प्रकाशात दुरुस्त्या केल्या. व्यक्तींचे आणि कार्यप्रसंगांचे मूल्यमापन केले. त्यांचे आणि त्यांच्या रियासतीचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

गेल्या तीस-चाळीस वर्षांत इंग्रजी, पोर्तुगीज, फार्सी, फ्रेंच या भाषांतील ऐतिहासिक कागदपत्रे नव्याने प्रकाशित झाली आहेत. भारताच्या स्वातंत्र्यानंतर परकीय सत्तांचे दप्तरखाने धुंडाळून संशोधकांनी अशा साधनांचा शोध लावला आहे. संस्थानांच्या विलीनीकरणानंतर अनेक कर्तबगार घराण्यांतील मोडी पत्रांची दप्तरेही खुली झाली आहेत. शासकीय दप्तरखान्यातील कागदपत्रांच्या



काही सूचीही तयार झाल्या आहेत. या सर्व ऐतिहासिक साधनांतून जी नवी माहिती प्रकाशात येत आहे तिचा उपयोग होणे आवश्यक आहे. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासातील काही धोरणांवर आणि प्रसंगांवर नवा प्रकाश पडू शकेल.

रियासतकारांनी मोठ्या परिश्रमाने आणि पूर्वग्रहरहित दृष्टीने इतिहास लिहिला हे खरे आहे; पण नव्या संशोधनाच्या प्रकाशात त्यांच्या ऐतिहासिक पुराव्यांचीही चिकित्सा करणे आवश्यक आहे. काही पुरावे त्यांच्या दृष्टीतून निसटले नसतीलच असेही म्हणता येणार नाही. म्हणूनच त्या उणिवा काढून टाकण्याचा प्रयत्न करणे आणि रियासतीला अद्ययावत संदर्भ देणे हाच आम्ही हाती घेतलेल्या नव्या संपादित आवृत्तीच्या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

❋❋❋

इतिहास घडवणारा इतिहास

"महर्षींच्या (रियासतकार सरदेसाई यांच्या) रियासतींनी महाराष्ट्रावर कधीही न फिटणारे उपकार करून ठेवले आहेत."

– प्रबोधनकार ठाकरे

रियासतकार गो. स. सरदेसाई कृत

मराठी रियासत

प्रमुख संपादक : स. मा. गर्गे

आठ खंडांचा संच



मूळ किंमत : ₹. ८५००/-

सवलतीत किंमत : ₹. ६०००/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवावा.

अधिक माहितीसाठी संपर्क 9867242407

ऑनलाईन नोंदणीसाठी वेबसाईट : www.popularprakashan.com

Follow us on: @popularprakashan



नीरजा : संवेदनशील स्त्रीवादाची अभिव्यक्ती

— स्वाती काळे

नीरजा या ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक म. सु. पाटील व आगरी लोकगीते संकलित करणाऱ्या विभावरी पाटील या उभयतांच्या कन्या. कवयित्री, लेखिका, कादंबरीकार म्हणून सर्वपरिचित असलेल्या नीरजा यांचा जन्म २३ ऑक्टोबर, १९६० मध्ये झाला. नीरजांनी इंग्रजी विषयात बी. ए., एम. ए. ची पदवी घेऊन विविध कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अध्यापनाचे कार्य केले. अध्यापनाबरोबरच त्यांनी मराठी साहित्यक्षेत्रातदेखील आपला ठसा उमटवला आहे.

१९६०च्या दशकात मराठी वाङ्मयामध्ये विविध साहित्यप्रवाह उदयास आले. त्यातील एक साहित्यप्रवाह म्हणजे स्त्रीवादी साहित्य. स्त्रीवादी साहित्याचा विचार केला असता त्यात 'कथा' या साहित्यप्रकाराला विशेष महत्त्व आहे. अनेक लेखिकांनी आपल्या कथांतून स्त्रीच्या

जीवनजाणिवा व्यक्त करण्याचा प्रयत्न केला; तसेच स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून कथा लिहिल्या. या कथा लेखिकांपैकी एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरील एक महत्त्वाचे नाव म्हणजे नीरजा.

नीरजांनी कविता, कथा, कादंबरी, ललित लेख, संपादन इ. अनेक साहित्य प्रकारांत लेखन केले आहे. त्यांचे लेख व मुलाखती विविध दैनिके व नियतकालिकांमधून सातत्याने प्रकाशित होत असतात. आत्तापर्यंत त्यांना अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त झालेले आहेत. 'साने गुरुजी ट्रस्ट'च्या अनुवाद सुविधा केंद्राच्या त्या सध्या अध्यक्षा आहेत. २३ ऑक्टोबर रोजी नीरजांचा वाढदिवस असल्याने सर्वप्रथम माझ्याकडून नीरजांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांचे लेखन सातत्याने चालू राहो व निरंतर वाचकांच्या भेटीस येवो, हीच सदिच्छा!...

नीरजांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या ***ओल हरवलेली माती, पावसात सूर्य शोधणारी माणसं, अस्वस्थ मी, अशांत मी*** *या पॉप्युलर प्रकाशनने प्रकाशित केलेल्या कथासंग्रहाबद्दल थोडेसे....*

नीरजा या प्रामुख्याने कवयित्री म्हणून परिचित. असे असले तरी नीरजांनी कवितेबरोबरच कथाविश्वदेखील समृद्ध केले आहे. पॉप्युलर प्रकाशनने प्रकाशित केलेल्या नीरजांच्या कथासंग्रहांचा विचार केला असता...

नीरजांच्या कथा या 'स्त्री'ला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेल्या आहेत. कथा स्त्रीवादी आहेत. स्त्री-केंद्रीत असूनही पुरुषांबद्दल कोठेही चीड, द्वेष व पूर्वग्रह त्यातून व्यक्त होत नाही. कथेतील घटना, प्रसंग वाचताना वास्तव जीवनातील गोष्टीच आपल्याभोवती घडत आहेत, असे वाटत राहते. भाषेच्या माध्यमातून लेखिका भावनांची देवाण-घेवाण करताना दिसते. आशयाला सुंदर व समर्थ भाषाशैलीची जोड दिल्यामुळे नीरजांची कथा उठावदार होते. आपल्या कथांतून त्यांनी हिंदी, इंग्रजी भाषेचा केलेला वापर; तसेच विविध वाक्प्रचार, म्हणी, काव्य, प्रतिके, प्रतिमा यांचा साधलेला समतोल या कथांमधून प्रामुख्याने आढळतो.

नीरजांच्या कथेत अनुभवांची विविधता दिसते. कथांतून मानवी नात्यांचे अनेक कंगोरे उलगडतात. नात्यातील ताणतणाव, दुरावा, प्रेम, समज-गैरसमज, लबाडी,

मतभेद, मनाचा कोंडमारा, एकटेपणा, असहायपणा, अन्याय, अत्याचार यांचे चित्रण येते. शहरी, निमशहरी, ग्रामीण असे विविध परिसर, मानवी मनाच्या व नात्यांच्या विविध तऱ्हा, विविध प्रकारच्या कौटुंबिक समस्या त्यांच्या कथेत प्रकर्षाने दिसून येतात. नोकरदार, व्यावसायिक, साहित्यिक, सामाजिक, कौटुंबिक, आध्यात्मिक अशा अनेक स्तरांतील व्यक्तिरेखा त्यांच्या कथेत आढळतात. नीरजांनी आपल्या कथांमधून विविध गंभीर समस्यांवर प्रकाश टाकलेला आहे. प्रत्येक कथा ही वेगळ्या धाटणीची आहे.

नीरजांची कथा वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करण्यास भाग पाडते. समाजातील स्त्रियांना येणाऱ्या अनेक समस्यांचा ऊहापोह नीरजांनी आपल्या कथेतून चित्रित केलेला दिसतो. याला फक्त पुरुषसत्ताक पद्धती कारणीभूत नसून स्त्री-पुरुष दोन्ही घटक तितकेच जबाबदार दाखविले आहेत. या कथांतून स्त्रीवर होणारे अन्याय, अत्याचार स्पष्ट दिसून येतात; पण तीही न घाबरता आलेल्या परिस्थितीशी दोन हात करू पाहते व आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

कथेतील स्त्री व्यक्तिरेखा

ती खंबीर, धाडसी, ठामपणे स्वत:चे निर्णय घेणारी, विचारी, स्पष्टवक्ती, समजूतदार, संवेदनशील, सहनशील, भावुक, हट्टी, दु:खी, अस्वस्थ, कष्टी, संयमी, स्वप्नरंजन करणारी, विशेषत: आधुनिक विचारसरणीचा अवलंब करणारी अशी चित्रित केलेली आहे. त्यांच्या कथेतील स्त्री आपली स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसते. तिच्यात असलेल्या धाडसी वृत्तीमुळे अडचणींवर मात करून ती आपला नवा मार्ग निवडते. त्यामुळे दु:ख उगाळत न बसता त्यातून सावरण्याचा ती प्रयत्न करते. स्वत:चे निर्णय स्वत: घेते व त्यातून होणाऱ्या परिणामांना सामोरीही जाते.

नीरजांची कथा ही विचारी व संवेदनशील स्त्रीच्या वाट्याला आलेले एकटेपण, विचार व भावना यांची चाललेली लढत, तिला मिळणारी दुय्यम वागणूक, त्यात तिच्या मनाचा होणारा कोंडमारा, त्यातून बाहेर पडण्यासाठी तिची चाललेली धडपड, स्त्री-पुरुष नात्यातील ताणतणाव, त्यांच्यात वाढत जाणारा दुरावा यांचे चित्रण करते.

कथेतील पुरुष व्यक्तिरेखा

कथेतील स्त्रीवर अन्याय होत असतो; पण त्या अपेक्षाभंगाचे दु:ख स्त्री-पुरुष दोघांनाही असते, याचे भान लेखिकेला आहे. काही कथांतील पुरुष हा पारंपरिक चौकटीत अडकल्याचे दिसते. पुरुषार्थ गाजवणारा, बाईने घरात राहून घरकाम करावे, घरातल्यांची सेवा करावी अशा विचारांचा; तर काही कथांतून संशयी वृत्तीचा पुरुष चित्रित केलेला आहे. विचारांनी स्वतंत्र असलेली स्त्री कथेतील पुरुषाला सहन होत नाही; तर काही कथांतून समजूतदार पुरुषदेखील चित्रित केलेला आहे. स्त्री-पुरुष व्यक्तिरेखांबरोबरच नीरजांच्या कथेतील बालव्यक्तिरेखादेखील समंजस व समजूतदार वाटतात.

कथेची निवेदनशैली

नीरजांच्या कथेत प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी निवेदन पद्धतीचा वापर प्रामुख्याने दिसून येतो. कथानकाची रचना ही अनुलोम-विलोम पद्धतीने केलेली दिसून येते. एखादी समस्या आणि त्यावर शोधलेली उकल हे कथारचनेचे

तंत्र प्रामुख्याने नीरजांच्या कथेत साधलेले दिसते. पात्रांच्या संवादातून त्या-त्या व्यक्तीचा सामाजिक स्तर, लिंगाधारित भेदभाव, वर्तन, स्वभाव व्यक्त झालेला आहे. त्यामुळे कथानक गतिमान करण्याचे कार्य संवादाद्वारे घडताना दिसते.

उदा. :

'गुरुचरित' **(पावसात सूर्य शोधणारी माणसं)** या कथेतील गुरू हा एक कलावंत आहे. तो कायम अस्वस्थ असतो. ही अस्वस्थता त्याची आई समजून घेते. त्याच्यासारख्या प्रतिभावंत कलावंताला सर्वसामान्य बुद्धिमत्तेची बायको नको होती. त्यामुळे 'बायको आपल्यासारख्याला शोभेल अशी स्मार्टच हवी', अशी गुरूची इच्छा असते. गुरूला तशी असामान्य बुद्धिमत्तेची बायको मिळतेही; परंतु ती तितकीच स्पष्टवक्ती, निर्भीडही असते. एकदा ती गुरूला म्हणते, 'तुझ्यासाठी मी माझ्या कलागुणांना मागे सारून फक्त नोकरी करत राहिले, मग माझ्यासाठी तुला वेळेत घरी नाही का येता येत?' ... किंवा ... 'केवळ तुझ्यावरच्या प्रेमामुळे माझे सारे व्यक्तिस्वातंत्र्याचे विचार मी विसरून गेले, माझी मतं मी मागे घेतली असताना तुझी सारी मतं तू माझ्यावर

कशी काय लादू शकतोस? तुला हवा तसाच पोशाख मी करते, मग तू माझ्यासाठी दारू का नाही कमी करू शकत? तुझ्या आईच्या मनात माझ्याबद्दल काय गैरसमज आहेत आणि असले तर तू ते काढून का नाही टाकत? तू कलावंत आहेस त्यामुळे तुझं मन मी जपेनच रे, पण तुलाही माझ्या मनाचा विचार नको का करायला?'

तर 'सावर रे SS' **(ओल हरवलेली माती)** या कथेतील मानसी ही मुळातच स्वतंत्र विचारांची आहे. एक स्वतंत्र, मुक्त आयुष्य जगण्यासाठी, स्वत:चे मार्ग स्वत:च्या मर्जीने निर्माण करण्यासाठी, इतरांनी दाखविलेल्या साऱ्या वाटा नाकारून, तिच्या शब्दांना समजून घेणारा पुरुष शोधण्यासाठी ती बाहेर पडली होती. ... आलोक तिचा चांगला मित्र असतो. तो तिला म्हणतो, 'इतर मुली ज्या स्वातंत्र्याचा विचार करू शकत नाहीत ते स्वातंत्र्य दिलं तुला तुझ्या आई-वडिलांनी.' मानसीच्या आई-वडिलांची एवढीच इच्छा होती की तिने राघवबरोबर व्यवस्थित संसार करावा. मानसीची अशी इच्छा, की तिच्या आई-वडिलांनी व राघवने तिला समजून घ्यावं. यावर आलोक तिला समजावून सांगतो, की 'अपेक्षा ही दोन्ही बाजूंनी

असते. आपल्या अपेक्षा म्हणजे आपल्याला आपले वेगळे विचार वाटतात. दुसऱ्यांच्या अपेक्षा म्हणजे केवळ मागण्या, हक्क वाटतात.' तसेच आलोक पुढे असेही म्हणतो की, 'आपण एकमेकांना चांगलं ओळखत असू, तर नाही होत गैरसमज मानसी.' त्यावर मानसी म्हणते, 'असं मलाही वाटायचं आलोक. आपण सर्वांना चांगलं ओळखतो असे भ्रम असतात आपले. पण ज्यांना चांगलं ओळखतो असं वाटतं तीच माणसं अनोळखी होत जातात.'

पात्रांच्या संवादांतून त्यांचे हे असे स्वभावविशेष कळून येतातच; पण कथानकालाही नेमके वळण मिळत जाते.

नीरजांनी आपल्या कथांची शीर्षके योजताना वेगळा विचार केलेला आढळतो. उदा.- 'पावसात सूर्य शोधणाऱ्या मुलीची गोष्ट', 'मडकं गेलं वाहून', 'महिषासुरमर्दिनी', 'प्रायश्चित्त', 'ओल हरवलेली माती', 'नियोग', इत्यादी.

त्यांच्या कथांतील प्रतिमासृष्टीही अनुभवविश्वाचे अनेकविध कंगोरे हाताळणारी आहे. उदा. — सुकाणूशिवाय भरकटलेली नाव, पावसात चिंब भिजलेल्या ओलेतीसारखा, सावली धरणारं झाड, थांबलेल्या पाण्यासारखं, इत्यादी.

नीरजा आपल्या कथांतून कथानकास पूरक अशा अनेक लोकप्रिय काव्यपंक्ती उद्धृत करतात; तर बऱ्याच ठिकाणी वाचकाला विचार करायला लावणारी वाक्येही त्यांनी उपयोजिली आहेत.

उदा. :

१) 'आपल्याला ज्या गोष्टींमुळे बरं वाटतं त्या गोष्टी केल्या की खरंच खूप बरं वाटतं.'

२) 'माणूस एकाच वेळी किती वेगवेगळ्या भावाविष्कारांना सामोरा जात असतो ह्याची आपण कल्पनाच करू शकत नाही. आता या क्षणी उल्हसित असलेलं आपलं मन दुसऱ्याच क्षणी झाकोळून जातं, क्षणात उदास वाटायला लागतं आणि ह्याचं कारण कधी कधी आपल्यालाही सापडत नाही...'

३) 'आपण लावत राहतो अर्थ प्रत्येक घटनेचा आपल्याला हवा तसा. आपणच कसे रास्त आहोत हे पटवून देत राहतो स्वत:ला आणि जगालाही.'

पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या **ओल हरवलेली माती, पावसात सूर्य शोधणारी माणसं, अस्वस्थ मी, अशांत मी** या कथासंग्रहांतून नीरजांनी स्त्री हा केंद्रबिंदू ठेवून तिची विविध रूपे विविध समस्यांच्या माध्यमांतून चित्रित केलेली आहेत. मानवी नातेसंबंधांचे विविध पदर आपल्या कथांतून उलगडून दाखवलेले आहेत. सर्व कथासंग्रहांची भाषा ही सहज, साधी, सोपी आणि स्पष्ट आहे. यातील प्रत्येक कथा ही वाचकाला वास्तवजीवनातील व आपल्याभोवती घडणारी वाटत राहते. या कथा अंतर्मुख करतात, विचार करण्यास प्रवृत्त करतात. स्त्रीकडे एक स्वतंत्र व्यक्ती, एक माणूस म्हणून बघण्याची जाणीव करून देतात. स्त्री-पुरुष नात्यातील समज-गैरसमज आणि त्याची केलेली उकल याचा समृद्ध अनुभव वाचकास मिळतो.

(स्वाती काळे ह्या पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर येथून पीएच.डी करत आहेत. 'उर्मिला पवार आणि नीरजा यांच्या कथावाङ्मयाचा अभ्यास' हा त्यांचा प्रबंध-विषय आहे.)

❋❋❋

नीरजा यांचे कथासंग्रह

ओल हरवलेली माती

पाने : २०८ । बांधणी : पेपरबॅक । आकार : ५.५'' × ८.५''


किंमत
₹. ३२५/-



पावसात सूर्य शोधणारी माणसं

पाने : २१० । बांधणी : पेपरबॅक । आकार : ५.५'' × ८.५''

किंमत
₹. ३५०/-



अस्वस्थ मी, अशांत मी

पाने : २१८ । बांधणी : पेपरबॅक । आकार : ५.५'' × ८.५''

किंमत
₹. ४००/-



सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तके खरेदी करता येतील.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट
popularprakashan.com

Available on amazon.in

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

दास्तान-ए-तुर्की

'पॉप्युलर प्रकाशन' हे मागील काही वर्षांपासून उत्तमोत्तम निवडक तुर्की साहित्याचा आणि त्यातही मुख्यत्वे तुर्की कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद वाचकांकरिता घेऊन येत आहे. अशाच काही मराठी अनुवादित तुर्की कादंबऱ्यांच्या परिचयाची लेखमाला — 'दास्तान-ए-तुर्की' — आपण 'प्रिय रसिक'मध्ये सुरू केलेली आहे. या सर्व कांदबऱ्या विविध बाजाच्या, विषयाच्या, शैलीच्या आणि मुख्य म्हणजे वाचकांना खिळवून ठेवून खऱ्या अर्थाने वाचनानंद देणाऱ्या आहेत. या मालेतील सर्व कादंबऱ्यांचा परिचय प्रवीण कलंत्री हे एक रसिक-वाचक करून देत आहेत.



हकन गुंदे

अनुवाद : शर्मिला फडके

हकन गुंदे हे आधुनिक तुर्की साहित्यातील एक प्रमुख लेखक आहेत. त्यांचे लेखन सामान्यत: मानवी मनातील वेदना, सामाजिक अन्याय, हिंसा आणि अस्तित्वाच्या प्रश्नावर आधारित असते. त्यांच्या लेखनातील कठोर वास्तवता विचारप्रवर्तक असल्याने तुर्की साहित्यात त्यांना 'अंडरग्राउंड साहित्या'चे प्रतिनिधी मानले जाते. त्यांचे साहित्य अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले असून ते तुर्कीतील तरुण वाचकांमध्ये लोकप्रिय आहेत. त्यांना २०११ साली सर्वोत्कृष्ट तुर्की कादंबरीकार म्हणून पुरस्कार मिळालेला आहे.

देर्दा ही कादंबरी तुर्की भाषेत 'AZ' या नावाने प्रकाशित झाली असून इंग्रजीत 'द फ्यु' या नावाने अनुवादित होऊन वीसपेक्षा जास्त देशांमध्ये ती प्रसिद्ध झाली आहे. हिंदी व मल्याळीतसुद्धा ती अनुवादित झाली असून शर्मिला फडके यांनी मराठीत 'देर्दा' या नावाने तिचा अनुवाद केलेला आहे. तुर्की भाषेत 'देर्दा' या शब्दाचा अर्थ 'व्यथा' किंवा 'दु:ख' असा होतो.

देर्दा ही एक अशी कादंबरी आहे ज्यात मानवी जीवनातील दु:ख, एकाकीपणा आणि जगण्याच्या धडपडीचे वास्तविक चित्रण आहे. दोन समांतर कथांचा वापर करून समाजातील श्रीमंत आणि गरीब, आधुनिक आणि पुराणमतवादी, शिक्षण घेतलेला वर्ग आणि निरक्षर वर्ग यांच्यातील दरी अत्यंत प्रभावीपणे दर्शवली आहे.

देर्दा... एक लहान मुलगी तुर्कस्तानातल्या इंस्तंबूलच्या एका खेड्यातून वयाच्या अकराव्या वर्षी तिच्या मनाविरुद्ध लग्न करून देऊन जबरदस्तीने

लंडनमध्ये आणली जाते. खरं तर तिला शिकायचं होतं. आईने आपण एका आठवड्यात परत येतो आहोत असं शाळेत सांगितलं होतं. त्यावेळी ती फक्त अकरा वर्षांची होती. लंडनमध्ये तिच्या वाट्याला आला फक्त बंदिवास आणि पतीच्या हातचा मार. अन्न खाण्यापेक्षा जास्त मार खावा लागत होता. बाराव्या मजल्यावरचा बंदिस्त फ्लॅट तिचं जग होतं. पाच वर्षांनी कशीतरी तिने तिथून स्वत:ची सुटका करून घेतली. आणि लंडनमधल्या व्यसनी आणि विकृत लोकांच्या जाळ्यात सापडली. हेरॉइनच्या व्यसनात अडकली. या सगळ्यात तिला अगदी लहानपणी सोडून गेलेल्या वडिलांचाही सहभाग असावा यापेक्षा मोठं दुर्दैव ते कोणतं! अगतिकपणे तिने वडिलांना ओळख दिली. ती त्यांची शेवटची भेट ठरली. वडिलांनी आत्महत्या केली आणि तिला पोलीसांनी व्यसनमुक्ती केंद्रात पोहोचवलं. तिच्यामुळे अनेक गुन्हेगार पकडले गेले. म्हणून पोलिसांनी तिला सहानुभूती दर्शवली. शिवाय तिला इंग्लंडचं

नागरिकत्वही मिळालं. त्यावेळी ती जेमतेम अठरा वर्षांची होती. त्यानंतर तिच्या आयुष्यात अशा काही घटना घडल्या की ती एडिन्बर्ग विद्यापीठाच्या पदवी वर्गात सर्वोच्च श्रेणी मिळवणाऱ्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांपैकी एक ठरली.

देर्दा... तोसुद्धा अकरा वर्षांचा होता. इंस्तंबूलच्या कब्रस्तानात कबरी धुण्याचं काम करायचा. वडील खून करून जेलमध्ये गेलेले आणि आई मरणपंथाला लागलेली. बाकी कोणीही नातेवाईक नसल्यामुळे जर आई मेली तर त्याला अनाथाश्रमात जावं लागलं असतं. म्हणून त्याने आई मेल्यावर कोणालाही समजू दिलं नाही. अगदी निष्ठुरतेने तिचं दफन केलं. काही दिवसांनी त्याच्या एका मित्राने त्याला एका छापखान्यात नोकरी मिळवून दिली. तिथे काही बेकायदेशीर, बंदी असलेली पुस्तकं छापली जायची. तिथेच तो वाचायला शिकला. एका पुस्तकावरचं ओझुक अतय हे लेखकाचं नाव बघितल्यावर या लेखकाची कबर आपल्या कब्रस्तानात आहे हे त्याच्या लक्षात आलं.

त्याची काही पुस्तके वाचून त्या लेखकाचा त्याच्यावर इतका प्रभाव पडला की त्याने त्या लेखकाला थेट देवत्व बहाल केलं. (ओझुक अतय यांना तुर्कीतील क्रांतिकारक लेखक समजले जाते.) हळूहळू आसपासची गुन्हेगारीवृत्ती त्याच्यावर प्रभाव टाकीत होती. अशातच वयाच्या सतराव्या वर्षी त्याच्याकडून दोन खून झाले. आणि चोवीस वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी तो जेलमध्ये गेला.

या दोन व्यक्तिरेखांभोवती कथानक घडत असतं. दोन्ही पात्राचं एकच नाव. देर्दा...

ही कादंबरी तुर्कस्तानमधील सामाजिक वास्तव आणि माणसातल्या विकृतीच्या विदारक चित्रणातून लंडनमधील गुन्हेगारीचे उघडे-नागडे वास्तव दाखवते... कथेतील दोन्ही देर्दा समवयस्क असले, तरी त्यांची जीवनप्रणाली आणि त्यांच्या वाट्याला आलेले अनुभव पूर्णपणे वेगळे आहेत. एक मुलगा, एक मुलगी. दोघेही अकरा वर्षांचे. त्यांची सुरुवात जरी इस्तंबूलपासून

झाली असली तरी पुढे वेगवेगळ्या देशांत, वेगवेगळ्या वातावरणात, वेगवेगळं जीवनमान असणारे, परिस्थितीने नाडलेले, त्यामुळे गुन्हेगार बनलेले. काही असेही लोक होते जे वेगवेगळ्या परिस्थितीत दोघांच्याही संपर्कात आले होते. व्यसनमुक्ती केंद्रात देर्दा मुलीची देखभाल करणारी ॲन कधीकाळी ओझुक अतयच्या सहवासात आली होती. ओझुक अतयविषयी देर्दा मुलाला आत्यंतिक आदर होता. देर्दा मुलीला व्हिसा देणारा अधिकारी कब्रस्तानात देर्दा मुलाला भेटला होता. लंडनमध्ये देर्दा मुलीने सुटका करून घेतल्यावर काही दिवस याच अधिकाऱ्याच्या घरात आश्रयाला होती. दोन्ही देर्दा आयुष्यात केवळ एकदाच काही क्षणांसाठी समोरासमोर आले होते, त्याच कब्रस्तानात. तेव्हाही त्यांच्यात एका शब्दाचाही संवाद झाला नव्हता.

लेखकाची लेखनशैली अतिशय प्रभावी आणि थेट आहे. दोन्ही पात्रांच्या वेदना आणि संघर्ष जवळून जाणवतो.

मृत्यू, हिंसा, शोषण आणि मानवी दु:खाचे चित्रण खूप प्रामाणिकपणे, अगदी वास्तवाला धरून केले आहे. त्यातील दाहकतेमुळे अनेक ठिकाणी वाचक अस्वस्थ होतो. आणि हीच अस्वस्थता आपल्याला विचार करायला लावते. समाजाच्या कटू वास्तवाकडे डोळसपणे पाहण्यासाठी प्रवृत्त करते. मानवी जीवनातील दु:ख, एकाकीपणा आणि जगण्याची धडपड कठोरपणे दाखवत सामाजिक प्रश्नांवर चिंतन करायला भाग पाडते.

शर्मिला फडके यांनी मूळ कादंबरीचा गाभा, भावार्थ आणि मूळ भाषेतील तीव्रता समर्थपणे मांडण्यात यश मिळवले आहे. आपल्यापेक्षा वेगळ्या संस्कृतीमुळे काही दंतकथा, उपमा, काही प्रतिकं आपल्याला नवीन वाटू शकतात. पण त्याने रसभंग होत नाही.

❋❋❋

दर्दा

हकन गुंदे | भाषांतर : शर्मिला फडके



किंमत
₹. ३७५/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तक खरेदी करता येईल.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट
popularprakashan.com

Available on
amazon.in

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक हर्ष भटकळ यांनी पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. यांचेकरिता ३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ येथे प्रसिद्ध केले. संपादक : अस्मिता मोहिते.